पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९६३ दि. ०९/०९/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर**

## गणेशोत्सव काळामध्ये पिकपॉकेटींग करणारे गुन्हेगार पकडलेबाबत...

दि. ०७/०९/२०१९ रोजी फरासखाना पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री. यशपाल सुर्यवंशी व तपास पथकातील महिला पोलीस शिपाई निशा कुंभार असे गणेशात्सवा निमीत्ताने पिकपॉकेटींग, चेन चोरी व इतर गुन्ह्यांना प्रतिबंध करणेकरीता बुधवार चौक ते बेलबाग चौक या भागात पेट्रोलिंग करीत असताना दगडुशेठ गणपती मंदिराजवळ दोन पुरुष व दोन महिला असे चौघेजण घाईगडबडीने व इकडेतिकडे पाहत येत असताना दिसल्याने त्यांचा संशय आल्याने त्यांना वरील स्टाफ यांचे मदतीने चौकशीकरता ते तेलगु भाषेत बोलत असल्याने त्यांच्याकडे चौकशी करण्यात अडचणी येत असल्याने त्यांना पोलीस स्टेशन येथे घेवुन येवुन तात्काळ तेलगु भाषा बोलणारा व समजणारा दुभाषिक आकाश येरु कुच्चर रा. काव्यकल्प संस्था, बुधवार पेठ, पुणे यास बोलावुन घेवुन, दुभाषिकामार्फत ताब्यात घेतलेल्या दोन पुरुष व दोन महिलांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव व पत्ते खालील नमुद प्रमाणे सांगितले.

१) विनय बाबुराव कुमार, वय २४ वर्षे, रा. प्रकाशनगर, कृष्णानगर, विजयवाडा, थाना ताडेपल्ली, जि. गुंटुर राज्य आंध्रप्रदेश
२) व्यंकटेश्वर नरसिंहराव उपु, वयय २९ वर्षे रा. सदर
३) प्रियांका मणीकंठ चडाला, वय २२ वर्षे रा. सदर
४) रमना कृष्णण चडाला, वय ४० वर्षे रा. सदर

वरील नमुद ताब्यात घेण्यात आलेल्या दोन महिला व दोन पुरुषांकडे दुभाषिक यांचेमार्फत चौकशी करता त्यांनी सांगितले की, दि. ०५/०९/२०१९ रोजी सायंकाळचे वेळी आम्ही सर्व जण डेक्कन कडुन स्वारगेटकडे जाणाऱ्या बसमध्ये बसुन प्रवास करीत होतो. सदरची बस डेक्कन पुलाकडुन अलीकडे आल्यावर गर्दीत उभ्या असलेल्या एका मुलीचे पाठीमागे अडकविलेल्या सॅकची चैन उघडुन त्यातील रोख रक्कम काढुन घेतली होती. त्यामधील ४,०००/- रु. आमच्याकडे शिल्लक असुन, उर्वरीत रक्कम आम्ही आमचे खाणेपिण्यावर खर्च केलेली आहे असे सांगितल्याने त्याबाबत विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा दाखल आहे अगर कसे याबाबत माहिती घेता, सदर घटनेच्या अनुषंगाने विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. ३१८/२०१९ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने वरील नमुद ताब्यात घेण्यात आलेल्या

आरोपींना त्यांच्याकडुन ताब्यात घेण्यात आलेल्या मुदेमालासह पुढील कार्यवाही करीता विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे वर्ग करण्यात आलेले आहे.

वरील कामगिरी ही श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १, श्री. प्रदिप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जगन्नाथ कळसकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे सुचनेनुसार, पोलीस उप निरीक्षक श्री. यशपाल सुर्यवंशी, व त्यांचे तपास पथकाचे कर्मचारी यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे